
दगडाची माणसं


निकी वेइस, मराठी: अश्विनी बर्वे



दगडाची माणसं

निकी वेइस, मराठी: अश्विनी बर्वे





अर्नी आपल्या आजीच्या मांडीवर जाऊन बसला.

“मला एक गोष्ट सांग ना, आजी,” तो म्हणाला.

“याचा अर्थ मेणबत्ती तयार करणाऱ्या रुबेनची गोष्ट?” आजीने विचारले.

“नाही, नाही" अर्नी म्हणाला, “दुसरी नवी गोष्ट.”


“घड्याळवाल्याची बायको फ्रेडा आणि तिच्या तीन मुलींची कहाणी?” आजीने विचारले.

“नाही आजी,” अर्नी म्हणाला. “कोणतीतरी नवी कहाणी, जी तू याआधी कधी सांगितली नसेल.”

"ठीक आहे," आजी म्हणाली. मग तिने एक क्षण विचार केला आणि आपली कहाणी सुरु केली....




ठीक आहे ऐक, एकदा इसहाक नावाचा एक फेरीवाला होता. तो एक गरीब विक्रेता होता, त्याच्याजवळ एका हातगाडी शिवाय दुसरं काही नव्हतं. एक वेळ अशी होती की जेव्हा इसहाकजवळ एक खेचर होते. पण ती फार पूर्वीची गोष्ट होती.



खेचर म्हातारपणामुळे मेलं. आणि इसहाक इतका गरीब होता की तो नवीन खेचर खरेदी करू शकला नाही.

म्हणून, तो आपली ढकल गाडी एका सुनसान गावाहून दुसऱ्या गावाला,मैलोनमैल ढकलू लागला. एका गावाहून दुसऱ्या गावाला सतत तो आपली गाडी ढकलत असे.



जेव्हा इसहाक शेवटी एखाद्या गावात पोहचे, तेव्हा त्याला बघून सगळे लोक प्रसन्न होत. त्याच्या ढकलगाडीवर सगळ्या छोट्या छोट्या वस्तू होत्या, ज्याची त्यांना गरज होती. लेस आणि कपडे, भांडी आणि धूपदान, किल्ला आणि बटणे, जुने बुटं आणि नवीन अंडरवियर. तुम्ही त्या सगळ्या गोष्टी इसहाक कडून खरेदी करू शकत होते.

“तुझ्याजवळ मधमाश्यांचे मेण आहे, इसहाक?” बेनी बेकरने विचारलं.

"इसहाक, मला एक कॉर्क काढणारा स्क्रू हवा” पनीर करणाऱ्याच्या पत्नीने मिन्नीने विचारलं.

इसहाक चुपचाप लोकांच्या हातात वस्तू सोपवत असे आणि त्यांच्या द्वारा दिलेले पैसे स्वीकारत असे. कधीकधी तो एखाद्या मुलाला एक छोटा दगडाचा माणूस भेट देत असे. जो तो आपल्या प्रवासाच्या दरम्यान तयार करत असे. मग तो आपली ढकल गाडी ढकलत दुसऱ्या गावी जात असे.

“तो विचित्र माणूस आहे,” खाटिक ओटो म्हणाला.


“तो कधी कोणाशी बोलत नाही,” घोड्याचा व्यापारी मॅक्स पुढे म्हणाला.

दूधवाल्याच्या मुलीने लीना म्हणाली, "मैदानी प्रदेशात इतकी वर्षे प्रवास केल्याने त्याला थोडा विचित्र केलं आहे.”




इसहाक थोड़ा विचित्र ज़रूर होता. इतकी वर्षे त्याने लोकांच्या बरोबर खूप कमी वेळ घालवला होता आणि अधिकाधिक काळ त्याने एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यात घालवला होता.

आणि नेहमी, जसे इसहाक गाव सोडत असे आणि पुढे गेल्यानंतर जेव्हा त्याला एखादे इतर घर, व्यक्ती किंवा प्राणी दिसत नसे, तेव्हा इसहाक आपली हातगाडी थांबवत असे. तो दगड शोधायला सुरुवात करे – छोटे-मोठे दगड, गोल-टोकदार दगड.



मग तो ते दगडांचा ढीग जमा करत असे. तो हातांसाठी दोन फांद्या लावत असे. मग तो आपल्या हातगाडीवरून एक जुने कपडा घेवून दगडांना बांधत असे. अशा पद्धतीने तो दगडांचा माणूस करत असे.







जेव्हा इसहाक आपल्या रस्त्याने पुढे जाई, त्यावेळी तो वेळोवेळी मागे वळून बघत असे. जिथं त्याचा दगडाचा माणूस उभा होता आणि ती दगडाची मूर्ती, एक धैर्यवान मित्रासारखी नेहमी इसहाकची वाट बघत असे. ते इसहाकचे दोस्त होते आणि ते त्याच्याशी बोलत असत. असं होऊ शकतं की ते मित्र उत्तर देत नसतील पण ते त्याचे मित्र होते जे इसहाकच्या हृदयातील गोष्टी जरूर ऐकत होते.

जस-जसा इसहाक पुढे जाई, तेव्हा त्याच्यात आणि त्याच्या दगडांच्या मूर्तीमध्ये अंतर वाढत गेले. तेव्हा त्याला आपल्या मित्रांना बघणे अजून कठीण होत असे... आणि शेवटी ते त्याच्या नजरेसमोरून अदृश्य होत असे.

तेव्हा इसहाक परत थांबत असे आणि मग काही दगड गोळा करत असे.

तो एकाच्या वर एक ते दगड ठेवे.


मग तो त्यात काही पानं आणि फांद्या जोडत असे.


आणि मग हातगाडीतून एक जुनी टोपी काढून ते सजवत असे.

मग तो अनेक मैल पर्यंत त्या दगडाच्या माणसाशी बोलत असे.

आणि अशा प्रकारे इसहाक पुढे जाई. एक दगडाचा माणसापासून दुसऱ्या दगडाच्या माणसापर्यंत. अशा प्रकारे एक गावातून दुसऱ्या गावापर्यंत, आपला प्रवास चालू ठेवत असे.







आता, जसं की त्याच्या नशिबातच लिहलं होतं, इसहाक ब्रुरिया नावाच्या गावात पोहचला, आणि तोपर्यंत पासओवर (यहूदी पर्व) च्या सुट्टीचे दिवस आले होते.

यहूदी पुजाऱ्याच्या पत्नीने एस्तेर म्हणाली, “इसहाक, मला एक मोठं भांडं हवं आहे.”

"इसहाक, मला थोडे काळे धागे वेत आहे” अबे शिंपी म्हणाला.

“तुम्ही ऐकलं आहे काय की व्लिस्कमध्ये काय झालं?” मोर्दकै मुंशी यांनी हातगाडीजवळ जमा झालेल्या लोकांना विचारलं.

“काय?“ त्यांनी सगळ्यांनी एका सुरात विचारलं.

“ज़ारच्या सैनिकांनी येऊन गावात खूप तोडफोड केली आणि खूप नुकसान केलं.मोर्दकै म्हणाला. “आता त्यांनी एका गावात तोडफोड केली म्हणजे,” अबे म्हणाला, “तर ते निश्चितपणे दुसऱ्या गावं नष्ट करण्याच्या योजना सुद्धा आखत असतील.”

इसहाकने चुपचाप लोकांना जे हवं ते दिलं. त्याने एका मुलीला एका छोट्या दगडाचा माणूस भेट दिला जो त्याने आपल्या प्रवासासाठी तयार केला होता.त्यानंतर तो आपली हातगाडी घेऊन दुसऱ्या गावाकडे निघाला. गावातले लोक, इसहाक आणि हातगाडी नजरेआड होतांना बघत होते.

“तो किती विचित्र माणूस आहे,” अबे शिंपी म्हणाला.

“माझ्या मते तो खूप शांत माणूस आहे,” यहूदी पुजाऱ्याची बायको म्हणाली.

“असं वाटतं की त्याला जगात इतर कोणा व्यक्तीची गरजच नाही,” मोर्दकै मुंशी म्हणाले. “मला त्याच्या सामानाशिवाय त्याच्यावर अधिक निर्भर राहावे वाटत नाही.”





इसहाक आपल्या रस्त्याने निघाला. रस्त्यात थांबून त्याने एक दगडाचा माणूस तयार केला आणि मग तो परत चालू लागला. काहीवेळानंतर त्याने दुसरा दगडाचा माणूस तयार केला.


त्याने आपला प्रवास चालूच ठेवला.

मग हळूहळू मैदानावर सूर्यास्त होऊ लागला आणि चारी बाजूला अंधार पसरला.

इसहाक रात्री आराम करण्यासाठी आपल्या हातगाडीवर अंथरून पसरणारच होता की त्याला पुढे एक चमचमणारा प्रकाश दिसला. त्याला काही लोकांचे आवाज सुद्धा ऐकू आले. इसहाकने हातगाडी तिथंच सोडली आणि तो हळूच काय आहे ते बघायला जवळ गेला.



एका झाडाखाली सैनिकांचा समूह शेकोटी पेटवून त्याच्या भोवती बसलेले त्याने पाहिले.



“पहाट होताच आपण ब्रुरियावर स्वारी करू,त्या लोकांना काय होत आहे हे समजण्याची संधी मिळण्याच्या आधीच,“ त्याने कोणाला तरी बोलतांना ऐकले.

“आपण वादळासारखे गावावर आक्रमण करू!” तिथून निघण्याआधी इसहाकने शेवटचे बोलणे ऐकले.




केवळ चंद्राच्या प्रकाशात इसहाकने पुढचा रस्ता पार केला. त्याने हातागाडीच्या मागेमागे उडत होता. त्याने त्याच दिवशी दगडाचे तयार केलेली माणसं मागे सोडली. जेव्हा शेवटी इसहाक ब्रुरिया पोहचला, तेव्हा कोणत्याही खिडकीत प्रकाश चमकत नव्हता. कोणीही आत्मा जागा नव्हता. पासओवर पर्व साठी काहीच दिवस उरले होते. म्हणून गावात प्रत्येकजण सफाई, फराळ तयार करण्याने ,देखभालकेल्याने, हिवाळ्याचे कपडे उचलून ठेवण्याने आणि सुट्टीसाठी पदार्थ करून थकले होते.

इसहाकने पळत जाऊन पहिला दरवाजा खटखटवला. पण तिथं कोणीही उत्तर दिले नाही. तो शेजारी पळाला,पण तिथंही कोणालाच आवाज ऐकू आला नाही.

इसहाकजवळ वाया घालवण्यासाठी वेळ नव्हता म्हणून तो परत पळाला.



अजूनही अंधारात मोर्दकै मुंशी जागा होता. “मला घोड्यांची टापा ऐकू येत आहे!” मोर्दकैने आपल्या पत्नीला म्हटलं. जेव्हा तो अंथरुणातून उठला, तेव्हा निश्चितपणे त्याच्या पायांखालची जमीन हळूहळू थरथरत होती..



मोर्दकै घरातून बाहेर आला आणि गल्लीत पळाला आणि ओरडला, “उठा, सगळ्यांनी! रूसी ज़ार (राजा) चे सैनिक येत आहेत.”

थोड्याच वेळात गावातील सगळे लोक जागे झाले आणि गाव इकडेतिकडे पळू लागले. “आपण काय करायचं?” ते ओरडले."


पण काही करण्यासाठी वेळ नव्हता. पळण्यासाठी किंवा रक्षा योजना तयार करण्यासाठी वेळ नव्हता. धान्याचा व्यापारी शमौन म्हणाला, “त्यांनी हमल्यासाठी बरोबर वेळ साधली, कारण पहाटच्या उजेडाचा फायदा घेऊ शकतील.” आता त्यांच्या गावाला वेढणाऱ्या पहाडांच्या टोकांवर एक नारंगी चमक दिसत होती.





“बास तेव्हाच सकाळचे कोवळे किरण आले, आणि सूर्य पहाड हळूच झाकू लागला. अचानक, गाववाल्यांनी आश्चर्याने पाहिलं, सैनिकांनी आपला लगाम खेचला आणि आपला घोडे रोखले. काहीवेळ भ्रम आणि अव्यवस्था ज़रूर होती. मग घोड़े वेगवेगळ्या दिशांना पळाले. मग सगळे वळले आणि धावत दूर गेले.

त्यांनी जे बघितलं, त्यावर गाववाल्यांचा विश्वास बसला नाही. “तुम्हांला वाटेल की त्यांनी कोणाचं तरी भूत बघितलं आहे,” बेनी बेकर म्हणाला. “किंवा देवाच्या दूताला,” यहुदी पाद्री म्हणाले.




खुरांच्या टापांचा आवाज जोरात येत होता, आणि गाववाले वाढत राहणाऱ्या प्रकाशाकडे बघून घोडेस्वारांच्या गतीचा अंदाज लावत होते. “यागावला आता कोणी वाचवू शकत नाही,” चांभाराची मुलगी रडू लागली..

“आता काही तरी चमत्कार व्हावा,” यहूदी पुजारी म्हणाला.

"ज़रा बघा!“ अबे शिंपी ओरडला, आणि मग सगळ्यांनी त्याच्या बोटाकडे बघितलं.

तिथं त्यांच्या चारी बाजूला पहाडांच्या वर दगडाच्या माणसांची एक रांग उभी होती. मंद प्रकाशात असे वाटत होते की जसे छोट्या गावाची रक्षा करण्यासाठी एखादी सेना तैनात आहे.



"अर्नी बघ, ही कहाणी याबाबत आहे की इसहाकने ब्रुरिया गाव कसे वाचवले," आजी म्हणाली.

“काय हे खरंच आहे आजी?” अर्नीने विचारलं.

आजी पुस्तकाच्या कपाटाजवळ गेली. तिने मांडणीतून काहीतरी उचलले आणि ते अर्नीला दिले..

“बघ!“ आजी म्हणाली. “दगडापासून तयार केलेला माणूस”


"ठीक असाच दगडाचा माणूस जसा इसहाक कहाणीत, गावातील मुलांना भेट देत असे!” अर्नी म्हणाला.

“तोच,“ आजी म्हणाली.


“तर तू तीच मुलगी होती?” अर्नीने विचारलं.


“मी ते सर्व काही आपल्या डोळ्यांनी बघितलं होतं,” आजीने उत्तर दिलं..

“पण नंतर इसहाकचे काय झालं?” अर्नीने विचारलं.



खैर, जेव्हा लोकांना कळलं की इसहाकने काय केलं ते, तेव्हा इसहाकचा मोठा सम्मान झाला. तो पासओवर पर्वाच्या दिवशी यहूदी पुजारीच्या टेबलवर एक सम्मानित अतिथि होता. सुट्टीच्या पूर्ण आठवड्यात इसहाकचा लोकांनी एखाद्या राजासारखा सत्कार केला.





पण मग सुट्टी संपली.

आणि आताचा ऑस्कर व्यापारी आणि अबे शिंप्याने त्याला नेहमीसाठी ब्रुरियात राहण्याचा आग्रह केला पण इसहाकने आपली हातगाडी सांभाळली आणि सगळ्यांना अच्छा केला. मग दुसऱ्या गावाकडे निघाले.

आणि जेव्हा पुढे जाऊन ब्रुरिया त्याच्या नजरेआड झाले तेव्हा इसहाकने आपली हातगाडी रोखली. त्याने काही दगड उचलले- काही छोटे,काही मोठे. त्याने ते एक दुसऱ्यावर ठेवले आणि सजवले. मग त्याने आपल्या हातगाडीतून एक जुने कापड काढले आणि ते दगडाच्या प्रतिमेत जोडले. आणि मग इसहाक आपल्या मित्राबरोबर गप्पा मारत राहिला जोपर्यंत तो दगडाचा माणूस त्याच्या नजरेआड होत नाही.



समाप्त